# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार १९ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक ४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये






गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक मो.न.9422660077


# आता मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना ! मिळणार मोफत गॅस सिलिंडर !

### आवश्यक कागदपत्रे अशी...

१)आधारकार्ड
२)रहिवाशी प्रमाणपत्र
३)रेशनकार्ड
४)उत्पन्नाचा दाखला
५)वयोगटाचा दाखला
६)मोबाईल नंबर
७)पासपोर्ट साईज फोटो




**नाशिक । सुरेश इंगळे**

राज्य शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा करतानाच पंतप्रधान उज्वला योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत वर्षांला तीन मोफत गॅस सिलिंडर देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे सध्यास्थितीत नाशिक जिल्ह्यात उज्वला योजनेत पात्र ठरलेल्या २ लाख ४१ हजार ६२२ लाभार्थी महिलांना वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत मिळणार आहेत. लाडक्या बहिणींचा संसाराचा गाडा सुरळीत चालावा यासाठी महिन्याला १५०० रुपये देण्याचा निर्णय घेताना बहिणींचे स्वयंपाकघराचे बजेड कोलमडू नये, यासाठी अन्नपूर्णा योजनेचा मुख्यमंत्री अन्न पूर्ण योजनेचा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार राज्यातील ५२ लाख १६ हजार ४१२ परिवारातील महिलांना वर्षाला तीन सिलिंडर मिळणार आहेत. गॅस सिलिंडर योजनेचा उद्देश मुख्यमंत्री गॅस सिलिंडर योजनेमुळे ( मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना ) दारिद्रय रेषेखाली जगणाऱ्या महिलांना स्वावलंबी जीवन जगण्यास मदत होणार आहे. राज्यातील सुमारे दीड लाख परिवारांमधील लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ होईल, असा शासनाचा अंदाज आहे.

### नोंदणी कुठे व कशी करणार

मुख्यमंत्री गॅस सिलिंडर योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी प्रथम मोबाइलमधील प्ले स्टोअरमधून नारी शक्ती दूत ॲप डाऊनलोड करावे., ॲपमध्ये रजिस्ट्रेशन करण्यासाठी लॉगइन करावे, लॉगइन करताना प्रथम आधारकार्डला लिंक असलेला मोबाईल नंबर नोंदणी करावा, यानंतर आवश्यक नियम अटी व शर्ती पूर्ण करून लॉगइन करावे. यानंतर रजिस्टर मोबाईल नंबरवर ओटीपी येईल, तो ओटीपी ॲपमध्ये दिलेल्या बॉक्समध्ये टाईप करून ओटीपी व्हेरीफाय करावा, यानंतर आपले पूर्ण नाव, ईमेल आयडी, जिल्हा, तालुका याची नोंदणी करावी. यानंतर नारी शक्तीचा प्रकार टाईप करावा. उदा. सामान्य महिला, गृहिणी, आंगणवाडी सेविका, ग्रामसेविका यापैकी. यानंतर प्रोफाईल अपडेटवर क्लिक करावे, यानंतर मुख्यमंत्री गॅस सिलिंडर योजनेचा नोंदणी फॉर्म भरावा. यानंतर मागणी करण्यात आलेले सर्व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावे. यानंतर प्रतिज्ञापत्र सबमीट करावे. फॉर्म सबमीट झाल्यावर आपणास एक नोंदणीचा नंबर प्राप्त होईल ज्यास आपल्याला सेव्ह करुन ठेवायचे आहे. अर्ज करताना अडचण आल्यास हेल्पलाईन

असे आहेत नियम, अटी व शर्ती
१)मुख्यमंत्री गॅस सिलिंडर योजनेचा लाभ घेणारी महिला ही महाराष्ट्र राज्याची मुळ निवासी असावयास हवी.
२)अर्जदार महिलेचे वय हे २१ ते ६५ दरम्यान असावयास हवे.
३)दारिद्रय रेषेखालील असणाऱ्या महिलांनाच या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.
४)एका कुटुंबातील एकाच महिलेला गॅस सिलिंडर योजनेचा लाभ होईल. १ जुलै २०२४ नंतर नवीन रेशनकार्ड धारक महिलांना या योजनेचा लाभ होणार नाही.
५)वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपये असणाऱ्या कुटुंबातील महिला सदस्यालाच या योजनेचा लाभ होणार आहे.
६)पात्र लाभार्थी महिलेचे आधारकार्ड लिंक केलेले असावे. ज्या परिवाराकडे १४.२ किलोचे घरगुती गॅस जोडणी आहे त्यांनाच या योजनेचा लाभ होईल.

# प्रकाश सोळंके यांची आशीर्वाद यात्रा जयसिंहासाठी विजयाची की पराजयाची?



**( माजलगाव ) माजलगाव**

तालुक्याच्या विधानसभा निवडणुकीतून प्रकाश दादा सोळंके यांनी निवृत्ती घेत एका कोपऱ्यात जयसिंह सोळंके यांना आपले राजकीय वारसदार घोषित करून जिल्ह्यातील आदर्श चूलता म्हणून स्वतःला मानकरी ठरवण्याचा प्रयत्न प्रकाश सोळंके यांनी केला आहे . जयसिह सोळंके यांना सोबत घेऊन माजलगाव तालुक्यातील जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी आशीर्वाद दौऱ्यावर निघालेले प्रकाश सोळंके यांनी निवृत्ती घेतल्यानंतर आपल्या माजलगाव तालुक्याला युवा नवीन तरुण तडफदार नेतृत्व मिळणार असल्याने माजलगाव तालुक्यातील तमाम तरुण वर्ग खुश झाल्याची मात्र चर्चाच होत आहे. परंतु " पुन्हा चल रे माझ्या मागल्या " या म्हणीनुसार प्रकाश सोळंके तरुण वर्गाला डावलत पद मोठे आणि लक्षण खोटे असणाऱ्या जुन्या आणि खोडसाळ कार्यकर्त्यांना घेऊन माजलगाव तालुक्याची विधानसभा लढवण्याचा प्रयत्न करत आहे, विद्यमान आमदार हे दिनांक 18 ऑगस्ट 2024 रोजी तालूक्यातील पुनंदगाव येथे दौऱ्यावर आले असता पुनंदगावच्या सरपंचाच्या घरी बंददार बैठक आयोजित केल्याने पुनंदगावातील जनतेने चुलत्या पुतण्याच्या आशीर्वाद यात्रेकडे जाहीरपणे पाठ फिरवीली असुन मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनाने जिल्हा भरात मराठा समाज एकवटला आहे तो मराठा समाज कोणाच्याच बापाची जागीर नसल्याने तो कोणाच्या मागे जाईल हे आत्तातरी सांगता येणार नाही असे असले तरीही आमदार प्रकाश सोळंके मात्र सुंभ जळाले तरी पीळ कायम या म्हणी प्रमाणे वागत आहेत ज्या गावात ज्या कार्यकर्त्यावर अख्खा समाज नाराज आहे अशाच कार्यकर्त्याच्या घरी जाऊन विजयासाठी आशीर्वाद मागत आहेत म्हणजेच बुडत्याचे पाय डोहाकडेच असे दिसत आहे तुमच्या जवळच्या कार्यकर्त्याचा आशीर्वाद मिळाला म्हणजे गावाचा आशीर्वाद मिळाला का? असा प्रश्न प्रत्येक गावातील जनता जाहीरपणे व्यक्त करत आहे. आता आमदार प्रकाश सोळंके यांनी जयसिंह सोळंके यांना सोबत घेऊन आशीर्वाद यात्रा काढली ती आशीर्वाद यात्रा विजयाची आहे की पराजयाची असा प्रश्न जनतेला पडला आहे. मराठा आंदोलनापासून प्रकाश सोळंके यांनी दूर ढकलेला समाज तथा गावकरी कोणत्या तरी एका कार्यकर्त्याच्या घरात बैठक घेऊन जवळ येईल का ? असा प्रश्नही माजलगाव तालुक्यातील मतदार वर्गातुन

# राजस्थानी ठेवीदार संघर्ष कृती समिती परळी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार

## लवकरच उमेदवाराच्या नावाची घोषणा करणार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी चेअरमन चंदुलाल बियाणी व त्यांचे सर्व संचालक मंडळ मागील नऊ महिन्यापासून ठेवीदारांच्या तीनशे कोटींच्या ठेवी घेऊन फरार झाले आहेत. महाराष्ट्रात ४२ शाखा असलेल्या राजस्थानी मल्टीस्टेटवर एकूण सात गुन्हे दाखल झाले आहेत. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. आपल्या ठेवी कशा परत मिळतील या विवंचनेने ठेवीदार हवालदिल झाले असल्यामुळे त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान सत्ताधारी व विरोधक यांच्यापैकी ठेवीदारांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळावेत यासाठी कोणीही काहीही कृती केलेली नाही. या सर्व बाबींना कंटाळून "राजस्थानी मल्टी स्टेट ठेवीदार संघर्ष कृती समिती" परळी विधानसभा लढवणार आहे.

नोव्हेंबर २०२३ पासून चेअरमन, सचिव यांच्यासह त्यांचे संचालक फरार झाले असून त्यांच्यावर सात ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. परंतु अद्याप पर्यंत कोणालाही अटक करण्यात आली नाही. फरार असूनही या सर्वांनी आपापली मालमत्ता विकून पैसे घेऊन गेलेले आहेत. आपल्या पैशाचे काय होणार ? या विवंचनेने ठेवीदार हताश झाले आहेत. शासन दरबारी अनेक वेळा साखळी उपोषण, आमरण उपोषण, मोर्चे, धरणे यासारखे अनेक आंदोलने केली आहेत. आंदोलनाचे अनेक मार्ग पत्करूनही हाताशी काही लागत नाही. विश्वासाने ठेवलेले पैसे मिळत नसल्याने अनेकांच्या लेकरांच्या खाण्याचा प्रश्न,शिक्षणाचा प्रश्न, लग्नकार्याचा प्रश्न, दवाखान्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही ठेवीदारांना ऱ्हदयविकाराचा धक्का तर काहींचा उपचाराविना मृत्यू झाला आहे. हक्काचे पैसे जमा असून वनवण भटकण्याची वेळ आली आहे. या सर्व बाबींचा विचार करून सत्ताधारी आणि



विरोधक निवडून येण्यासाठी वाटेल तशी मतदारांची दिशाभूल करतात, जातीपतीचे राजकारण करतात पण आडल्या नडलेल्यांना वाऱ्यावर सोडतात हे आपण वेळोवेळी बघितलं आहे. आपल्या ठेवीदारांमध्ये सुद्धा सर्व जाती धर्माचे लोक आहेत. जातीपातीचे राजकारण न करता ठेवीदार हीच जात समजून आपण आपलाच माणूस आमदार करू हा निर्धार ठेवीदारांच्या वतीने करण्यात आला आहे. परळी विधानसभा मतदार संघात ठेवीदारांचे ५० हजार मतदान असून येत्या निवडणुकीत "राजस्थानी मल्टी स्टेट ठेवीदार संघर्ष कृती समिती" च्या वतीने परळी विधानसभा निवडणूक पूर्ण ताकतिनिशी लढवण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे. "जीवाचे रान करू पण उमेदवार निवडूनच आणू" असा निर्धार ठेवीदारांनी आज झालेल्या बैठकीत एकमुखाने केला आहे. लवकरच उमेदवाराच्या नावाची घोषणा करणार असल्याचे राजस्थानी मल्टीस्टेट ठेवीदार संघर्ष कृती समिती परळी वैजनाथ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

# नारायणगडच्या विकासासाठी उखंडाकरांचलाख मोलाची देणगी

## दिंडीच्या व्यवस्थेसाठी केली होती वर्गणी

**बीड प्रतिनिधी :-**धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकासासाठी जिल्ह्यातील भक्तगण सरसावलेले आहेत. उखंडा (ता.पाटोदा) येथील ग्रामस्थांनी १ लाख ७ हजार रूपयाची देणगी गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्याकडे सुपूर्द केली. शिवाय भविष्यातही आम्ही गडासाठी वाट्टेल ती मदत करू, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातून भक्त येत असतात. येणाऱ्या भक्तांची चांगली सोय व्हावी, आणि गडाचा विकास व्हावा, यासाठी शासनासह भक्तगणही देणगीच्या रूपाने मोकळा हात सोडत आहेत. उखंडा येथील ग्रामस्थांनी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाची दिंडी पंढरपूरला जात असताना दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी गावात वर्गणी जमा केली होती. सदरील वर्गणीतून वारकऱ्यांची सेवा केल्यानंतर १ लाख ७ हजार रूपयांची रक्कम शिल्लक होती. सदरील रक्कम वारकऱ्यांच्या सेवेसाठी जमा



केलेली होती, आणि ती रक्कम गडाच्याच कामी यावी, अशी भावना ठेवून ग्रामस्थांनी एकत्रित येत सदरील रक्कम श्री. क्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांची गडावर भेट घेवून सुपूर्द केली. उंखडा येथील ग्रामस्था महिना वारीनिमीत्त नारायण गड येथे दर्शनासाठी येत असतात. त्यांची गडावर श्रध्दा असून यापुढे देखील गडाच्या विकासासाठी आम्हाला शक्य तो हातभार लावू, असेही त्यांनी म्हटले. यावेळी गावातील जेष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# बीड जिल्ह्यातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राख्या बांधण्यासाठी महिला भगिनी मुंबईला रवाना

## बीड जिल्ह्यातील दोन लाख बहिर्णींची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांना राखी भेट

बीड ।प्रतिनिधी

तळागळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी महिलांसाठी कल्याणकारी योजनांसह लाडकी बहीण योजना लागू केली आहे. या योजनेचा लाभ माता भगिनींना झाला असून यापुढेही या योजनेचा लाभ महिलांना दरमहा मिळणार आहे. या निर्णयाचा फायदा अडीच कोटीहून अधिक महिलांना होणार आहे. यासोबतच मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून महिलांना वर्षातून तीन सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारांवरून वाढवून ३० हजार करण्यात आले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. १० हजार महिलाना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यंत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे राज्यातील महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. एकनाथ शिंदे यांनी महिलांबाबत घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील महिलांमध्ये आशा निर्माण झाली आहे. शासनाने महिलांसाठी कल्याणकारी योजना सुरु करून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले आहे. यामुळे राज्यातील 'उमेद'च्या महिला कर्मचारी मुख्यमंत्र्यांना एक कोटी राख्या पाठविणार आहे. याबरोबरोबरच बीड जिल्ह्यातून २ लाख राख्या घेऊन वीस महिला भगिनी लाडक्या भाऊराया मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना राखीपौर्णिमा दिनी राख्या बांधण्यासाठी काल रात्री सायं ७.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील जालना रोड येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथून रवाना झाल्या आहेत. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक शिवसेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# रसशोषक किडीसाठी प्रतिबंधात्मक उपाय कोणता?

# पीक वाढीच्या काळात करा या उपाययोजना

सध्या कापूस हे पिक वाढीच्या अवस्थेत आहे. झाडाला कळ्या लागायला सुरुवात झाली आहे. कोणतही पिक कोवळ्या अवस्थेत असताना त्यावर रसशोषक किडींचा अधिक प्रादुर्भाव पाहायला मिळतो. कारण कोवळ्या अवस्थेत पिकं अधिक रसदार असतात. या अवस्थेत पिकांवर रसायनांचा वापर केल्यास मित्र किडींचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. म्हणुन सुरुवातीच्या अवस्थेत कीड नियंत्रणासाठी पिकावर कोणत्याही प्रकारच्या रसायनाची फवारणी करू नये. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी



कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात याबद्दल सविस्तरपणे माहिती सेंद्रिय शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी शेतकऱ्यांना दिली आहे. पिकांवर कीड नियंत्रणाचे उपाय करताना अचूक कीड ओळखून, निरीक्षण करूनच कीड व्यवस्थापनाचा निर्णय घ्यावा. पिक उगवून आल्यानंतर लगेचच पिकाच्या उंचीपेक्षा १ फुट उंचीवर पिवळे चिकट सापळे लावावेत. पिकाची उंची जसजशी वाढत जाईल जाईल तशी तसे चिकट सापळे उंचावर सरकावयाचे आहेत. फवारणीकरिता ५ टक्के निमअर्काचा वापर करावा. २-३ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात डोस घेऊन झाडे व्यवस्थित धुवून निघतील अशा पद्धतीने सावकाश फवारणी करायची आहे. निमअर्क फवारल्या नंतर हळद ताक द्रावणाची फवारणी करायची आहे. त्यासाठी २०० ग्राम हळद १ लिटर पाण्यात उकळून गाळून घ्यायची आहे. हळदीचे पाणी थंड झाल्या नंतर ते ४ लिटर पाण्यात मिसळावे आणि त्यानंतर तयार झालेले मिश्रण २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून तयार द्रावणाची फवारणी पिकावर करावी. रसशोषक किडी आणि कापसाची शेंड्याची पाने आकडलेली दिसल्यास हा उपाय चांगले परिणाम देतो. हळद ताक द्रावणाला पर्याय म्हणुन किंवा किडींचा अधिक प्रादुर्भाव असेल तर अशा वेळी निमगोमुत्र अर्काची फवारणी करावी. यासाठी २० लिटर गाईच्या गोमुत्रात २ किलो ताजे शेण आणि १० किलो कडूनिंबाचा पाला किंवा लिंबोळी पावडर टाकून एकजीव मिश्रण तयार करावे. १२ तास सावलीत हे मिश्रण भिजत ठेवून फवारणीच्या वेळी २०० लिटर पाण्यामध्ये १० लिटर आणि किडींचा जास्त प्रादुर्भाव दिसत असेल तर २०० लिटर पाण्यामध्ये २० लिटर टाकून फवारणी घ्यावी. निमगोमुत्र द्रावण पाण्यात मिसळण्या अगोदर सुती कापडाने गाळून घ्यावे. यासोबतच रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालेली पिकाची गळालेली पाने, कापसाची बोंडे जमा करून नष्ट करावीत. जास्तीच्या नत्र खतांचा वापर कमी करावा. शिफारशीनुसार लागवडीचे अंतर ठेवावे. मित्र किडींचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मुग यासारखी आंतरपिके/मिश्रपिके घ्यावीत. कापसाच्या पिकाभोवती झेंडू, मोहरी किंवा एरंड या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी. फवारणी करत असताना शक्यतो अमावास्येला किंवा पौर्णिमेला करावी असा सल्ला सेंद्रिय शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

पल्लवी चिंचवडे - सेंद्रित शेती अभ्यासक

## गंगापूर येथे धम्म परिषद व लिंबूनि बुद्ध विहार सभा मंडप कामाच्या भूमिपूजनाचे १९ ऑगस्टला अयोजन

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर शहरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील लुंबिनी बुद्ध विहार येथील दुसऱ्या मजल्याच्या सभा मंडपाचे भूमिपूजन व बौद्ध धम्म परिषद सोमवार दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न होत आहे. आमदार सतिष भाऊ चव्हाण यांच्या निधीतून लुंबिनी बुध्द विहाराच्या दुसऱ्या मजल्याच्या (सभा मंडप ) च्या कामासाठी ४० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला त्या अनुसंघाने लुंबिनी बुद्धविहाराचे (सभामंडप) वरचा मजलाचे बांधकाम भुमिपुजन व एकदिवसीय बौध्द धम्म परिषद व भुमिपुजन सोमवार वेळ सकाळी ११:३० वा.व बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भंदत उपगुप्त महाथेरो व सतिष भाऊ चव्हाण यांच्या हस्ते दु.१२वा.होईल.या धम्म परिषदेचे अध्यक्ष संजय भाऊ जाधव असतील.भिक्खु संघाचे भोजनदान सकाळी ११.०० वा.व त्या नंतर धम्म देसना होईल. याप्रसंगी पुज्य भंदत उपगुप्त महाथेरो पुर्णा,पुज्य भंदत सत्यपाल महाथेरो,पुज्य भन्ते रत्नबोधी व आ. सतिष भाऊ चव्हाण,संजय जाधव, फैसल चाऊस, अरुण बोर्डे,प्रा.सुनिल मगरे,अनिल जाधव, शेकुजी खाजेकर,संदिप खाजेकर,रामनाथ शिराळे,प्रशांत नन्नावरे,ज्ञानेश्वर साबणे, संदीप साबणे,प्रा. संदिप गायकवाड, तुकाराम सटाले,बाबुराव कदम,संजय ठोकळ,काकासाहेब गायकवाड,जितेंद्र सिरसाठ, प्रविण नितनवरे,डॉअरुण जराड उपविभागीय अधिकारी,नवनाथ वाकवाड तहसिलदार गंगापूर, रंगनाथ तुपे आरोग्यअधिकारी,डॉ. सुनिल उबाळे, समाधान आराख साहेब(B-DO)रावसाहेब तोगे, शामसुंदर धुत,सोपान देशमुख,




योगेश पाटील,सुरेश नेमाडे,दिनेश गायकवाड,संतोष अंबीलवादे,रामेश्वर नावंदर, मोहसीन चाऊस,बदरजहूरी,नईन मन्सुरी,खालेद नाहादी,अशोक खाजेकर, बाबा भरपुरे, राजु खाजेकर,बाबा भिवसने,बापु खाजेकर,सागर दळवी,फकिरचंद खाजेकर, संतोष तुपलोंढे, सुनिल खाजेकर, रावसाहेब साळवे,किरण पोळ,सागर खाजेकर, शिवा जाधव,प्रदिप वंजारे,राज खाजेकर,राजु जाधव,रोहन सिरसाठ,विशाल खाजेकर, भगवान बनकर,एकनाथ खाजेकर,बाबासाहेब गजभिव,लखन बनसोडे,सचिनगायकवाड, राकेश खाजेकर, रुपचंद गाडेकर, शांतवन खाजेकर, ॲड. सुनिल गायकवाड,सुरेश शिनगारे,रंगनाथ खाजेकर,भागीनाथ किर्तीशाही ,किसन बर्वे,कैलास साळवे,पोपट खाजेकर,किशोर बनकर,संदिप माघाडे,दयानंदखाजेकर, मनोहर खाजेकर,रमेश खाजेकर,आनंद भिवसने, एकनाथ सिरसाठ, शाईनाथ खाजेकर, वैभव खाजेकर,प्रविण बर्फे, पत्रकार लक्ष्मीकांत माघाडे,गणेश त्रिभुवन, चंद्रहर खाजेकर,राहुल कोळसे,राहुल पारखे, अमोल साळवे, राहुल सोनवणे, संघपाल जाधव,मच्छिंद्र हिवाळे,व्ही. बी.सुखदान, भगवान सुखदान, अविनाश गायकवाड, ॲड. विजय खाजेकर,किरण जाधव,अनिल उबाळे,शांतवन उबाळे, नवनाथ नरवडे,गोरख नरवडे, कारभारी नरोडे,संदिप कोळसे, प्रमोद भालेराव,नितीन भालेराव, संदिप तुपे,कारभारी गजहंस, ॲडविशाल माघाडे, शरदकुमार कोळसे,गौतम साळवे,गौतम कोळसे,भास्कर त्रिभुवन,पवन खाजेकर,प्रकाश खाजेकर, सुरेश वाकडे,आदित्य हिवाळे, लक्ष्मीकांत साळवे,आशिर्वाद रोडगे,चंदन दाभाडे, ॲड. सुशिलकुमार शिराळे,भागिनाथ तुपे व रील मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य धम्म परिषद संपन्न होणार आहे तरी गंगापूर तालुक्यातील व शहरातील बौध्दउपासक व उपासिकानी उपस्थित रहावे. असे आवाहन अयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राकाँपा सोशल मिडिया रांजणी सर्कल प्रमुख पदी मोईन तांबोळी व शहराध्यक्ष पदी सय्यद अख्तर

जालना/असलम कुरेशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या सोशल





मिडिया रांजणी सर्कल प्रमुख पदी रांजणीचे कार्यकर्ते मोईन बाबू तांबोळी यांची, तर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टीच्या रांजणी शहराध्यक्ष पदी सय्यद अख्तर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे घनसावंगी तालुका सोशल मिडिया तालुका अध्यक्ष बद्रीनाथ आरबड यांनी मोईन तांबोळी यांची तर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टीच्या रांजणी शहराध्यक्ष पदी सय्यद अख्तर यांची नियुक्ती तालुकाध्यक्ष संभाजी देशमुख यांनी केली असून त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील व आ. राजेशभैय्या टोपे साहेब यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी खा. अमोल कोल्हे, माजी आ. बाबाजानी दुर्राणी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हा अध्यक्ष डॉ निसार देशमुख, रांजणीचे सरपंच अमोलभाऊ देशमुख, धनंजय देशमुख, शेख इरफान, ग्रामपंचायत सदस्य इरफान कुरेशी, इरफान तांबोळी आदी उपस्थित होते. या नियुक्तीबद्दल मोईन तांबोळी व सय्यद अख्तर यांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे कार्यकर्ते आदींनी अभिनंदन केले.

## मुख्यमंत्री: माझी लाडकी बहिण योजना, २ लाख ९० हजार ८७१ बहीणींच्या अर्जांना मान्यता

**जालना । प्रतिनिधी**

महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेली शासनाची महत्त्वाकांक्षी योजना 'मुख्यमंत्री:माझी लाडकी बहीण' साठी जिल्ह्यातील २ लाख ९० हजार ८७१ बहिणींचे अर्ज मान्य झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे. यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, 'मुख्यमंत्री: माझी लाडकी बहिण योजना' जिल्ह्यात राबविण्यात येत असून महिलांच्या नाव नोंदणीसाठी जिल्ह्यात प्रत्येक गावात व्यवस्था करण्यात आली. जिल्ह्यात ३ लाख ५६६ महिलांनी या योजनेसाठी अर्ज दाखल केले होते. या अर्जांची छाननी होऊन आतापर्यंत २ लाख ९० हजार ८७१ जणींच्या अर्जांनां




मान्यता देण्यात आली आहे. ६ हजार ३९९ जणींच्या अर्जांवर निर्णय झालेला नाही,असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रलंबित अर्जांबाबत अशा बहिणींकडून राहिलेल्या त्रुटी वा अर्ज भरण्यात काही चुका झाल्या असल्यास त्यांच्याकडून त्याची पूर्तता करून त्यानंतर अंतिम निर्णय होईल.

## प्रो गोविंदाच्या माध्यमातून गोविंदा खेळ जगभरात पोहचल्याचा आनंद-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रो गोविंदा लीगच्या माध्यमातून १०० वर्षांची परंपरा असलेला गोविंदा हा खेळ जगभरात पोहचल्याचा आनंद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. वरळी येथील एन.एस.सी.आय.डोम येथे आयोजित प्रो गोविंदा लीगच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, मिलिंद देवरा, आमदार प्रताप सरनाईक, मोहम्मद दुराणी, पुर्वेश सरनाईक आदिंसह स्पर्धांचे आयोजक, संघ मालक, गोविंदा पथक उपस्थित होते. खेळामध्ये स्पर्धा असली पाहिजे, पण ती जीवघेणी नसावी. त्यामुळे यंदा आपण सर्वांनी अपघातमुक्त




गोविंदा उत्सव साजरा करूया असे आवाहन करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा खेळ सुरू आहे. या खेळाचा समावेश साहसी क्रीडा प्रकारामध्ये करण्यात आला आहे. या ठिकाणी अनेक गोविंदा उपस्थित आहेत. या गोविंदांच्या विमा संरक्षणाची जबाबदारी शासनाने घेतली आहे. यंदाच्या वर्षी ७५ हजार गोविंदांचा विमा उतरविण्यात आला आहे. भविष्यात हा खेळ ऑलिंपिकमध्ये सहभागी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यंदा आपण ६० गोविंदांना स्पेनला पाठवतो आहोत. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, खेलो इंडियाच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खेळाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळेच आपण ऑलिंपिकमध्ये ६ पदक जिंकली आहेत. त्यामध्ये कोल्हापूरच्या स्वप्नील कुसाळे याचाही समावेश असल्याचा अभिमान आहे. शासन युवक आणि युवतींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आता लाडकी बहीण प्रमाणेच लाडका भाऊ योजना आणली आहे. कौशल्य विकासच्या माध्यमातून युवक युवतींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणार्थींना मानधन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. युवक युवतींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

या स्पर्धांमध्ये एकूण ३२ संघ सहभागी झाले होते. त्यापैकी १६ संघांनी आजच्या अंतिम फेरीत आपले कौशल्य सादर केले. यंदाच्या वर्षी सातारा सिंघम यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

## देव हे संत आहेत आणि संत हे देव आहेत नारायण महाराज भाऊ यांचे प्रतिपादन..

**बीड प्रतिनिधी**

- साधने मध्ये निर्भय अवस्था श्रेष्ठ झाली पाहिजे.अभयापेक्षा निर्भय श्रेष्ठ आहे. आनंद फक्त अनुभवावा लागतो.संत जी इच्छा करतात ना ती पूर्ण होत असते, ज्ञानाने प्रकाश पडतो, पण क्रिया आपल्यालाच करावी लागतात.देव अनुभवावा लागतो, आनंद हे देवाचे स्वरूप आहे, देव हे संत आहेत आणि संत हे देव आहेत, दोन्ही मध्ये काहीही फरक नाहि, संत हे याच शरीरामध्ये सर्व अवस्था प्राप्त करुन देतात. देव पूजा करणे म्हणजे भक्ती करणे होय. शरीरामध्ये भगवान परमात्म्याला अर्पण करण्यासाठी महत्त्वाचा भाग हा हृदय आहे. लोटांगण घालणं ही शेवटची शरणांगती आहे. नामाशिवय सुखाची प्राप्ती होत नसते ते सूख प्राप्त करण्यासाठी भगवान परमात्म्याला शरण जावे लागेल.तीर्थ यात्रेमध्ये अनेक साधू संत एकत्र येतं असतात. त्या एकत्र आल्यावर ज्या भूमीवर येतात. ती भूमि पावित्र भूमि होते. विसाव्या शतकातील महान संत विभुती वै. ह. भ. प ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपा आशिर्वादाने आणि ह भ प गुरुवर्य तपोनिधी शांतीब्रह महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व गुरूवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात 12 ऑगस्ट 2024 या दिवशी झाली आणि सांगता 19 ऑगस्ट 2024 रोजी होणार आहे. यादरम्यान 17 ऑगस्ट 2024 सहाव्या दिवसाची कीर्तन सेवेमध्ये नारायण महाराज भाऊ बोलत होते. ह भ प नारायण महाराज भाऊ यांनी जगद्गुरु तुकाराम यांचा चार चरणाचा अभंगावर चिंतन केले.



घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥१॥ हरीनामकीर्तन संतांचे पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ध्रु.॥ आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःख नाहीं चाड आम्हां ॥२॥ आणीक सायास न करीं न धरीं आस। होईन उदास सर्व भावें ॥३॥ मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी। होय सांगों ऐसी तुका म्हणे ॥४॥ देवा मी जन्म घेईन तर केवळ तुझी चरण सेवा साधण्याकरीताच. मग मी हरिनाम कीर्तन करीन संतांची पूजन करीन आणि महाद्वारात लोटांगण घालीन. आम्ही जिथे कुठे राहू तेथे आनंदाने समृद्ध राहु. सुख आणि दुख यांची आवड तर आम्हाला राहिलीच नाही. तुझी चरण सेवा करण्यावाचून इतर कोणतेही कष्ट मी करणार नाही आणि कशाचीही इच्छाही धरणार नाही आणि मग या संसारापासून मी सर्वभावे उदास होऊन राहील. तुकाराम महाराज म्हणतात अहो मोक्ष तर आमच्या घरी काम करणारी दासीच आहे तिला आम्ही जसे काम सांगू तसे काम ती करते. संपत्ती ही पचवता आली पाहिजे आणि ज्ञान हे पचवता आले पाहिजे इंद्रियांच्या पलीकडे बुद्धी आहे. ज्या गोष्टी देवाला करता येत नाही त्या गोष्टी संत करत असतात. संतांच्या पूजनात जेवढ पुण्य आहे ना तेवढ पुण्य कश्याताच या नाही. यावेळी मृदंगाचार्य अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, अविष्कार महाराज क्षीरसागर, राधाकृष्ण महाराज माखले, महादेव महाराज रोडे, ह. भ. प हनुमान महाराज घोलप, ह. भ. प प्रशांत महाराज क्षीरसागर , गणेश महाराज भोसले, अनिकेत महाराज आविष्कार महाराज क्षिरसागर तसेच महाराज मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी नानासाहेब काकडे पोलिस पाटील चाकरवाडी, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, बाबासाहेब मोरे, माजी सरपंच चत्रभूज पवार, परमेश्वर भोसले सर, अनवणे काका, माऊली न्युज मुख्य संपादक पवार अभिजीत, चाकरवाडी ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शिक्षकांची २९६ पदे अतिरिक्त मात्र शिक्षण विभागाला समायोजनासाठी वेळ मिळेना; शिक्षकांच्या नियुक्तीसाठी ग्रामस्थांवर आंदोलनाची वेळ :- डॉ.गणेश ढवळे

**बीड:**--- ( दि.१८) बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये शिक्षकांच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरवणे, शाळेला कुलूप ठोकणे, पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणे अशा घटना घडत असुन प्राथमिक पदवीधरांच्या रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे अशी मागणी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी ; मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांना लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, शेख युनुस,शेख मुबीन यांनी केली आहे. मात्र भगवान फुलारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांनी शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड अंतर्गत सद्यस्थितीत सहशिक्षकांची २९६ पदे रिक्त असुन त्यांचे समायोजन करण्यासाठी सह शिक्षकांना प्राथमिक पदवीधर, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख या पदांवर पदोन्नती देऊन जिल्हा परीषद मध्ये रिक्त होतील त्या पदांवर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचे प्रस्तावित असून अतिरिक्त सहशिक्षकांचे समायोजन झाल्यानंतर लगेच आंतरजिल्हा बदलीने रूजु झालेल्या सह शिक्षकांना पदस्थापना देण्यात येईल म्हटले आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन अडीच महिने झाले आहेत. अनेक शाळांना शिक्षक नसल्याच्या तक्रारी असुन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल मात्र शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.



सविस्तर माहितीस्तव बीड जिल्ह्यात मराठी व उर्दू माध्यमातील प्राथमिक पदवीधर शिक्षकांच्या मंजुर १५२८ पदांच्या तुलनेत ११४२ शिक्षक कार्यरत आहेत. जिल्ह्यात २०२२-२३ च्या संच मान्यतेनुसार सहशिक्षकांची ६२४३ मंजुर पदे आहेत.कार्यरत पदांची संख्या ६३३५ आहे तर जवळपास २९६ पदे अतिरिक्त आहेत.

तालुक्यातील अतिरिक्त शिक्षक

| तालुका. | मंजुर पदे. | अतिरिक्त |
| --- | --- | --- |
| अंबेजोगाई | ४६२ | २९ |
| आष्टी | ७११ | ३१ |
| बीड | ९८३ | १०० |
| गेवराई | ८९२ | ४८ |
| धारूर | ३६० | २२ |
| केज | ६३० | ०५ |
| माजलगाव | ५६७ | ०६ |
| परळी | ४९६ | ३० |
| पाटोदा | ४२६ | ०० |
| शिरूर (का) | ४३५ | १२ |
| वडवणी | २८१ | १४ |
| एकुण | ६२४२ | २९७ |

आंतर जिल्हा बदलीने रूजु ५० शिक्षकांना पदस्थापनाच नाही ; ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयाचे उल्लंघन:-डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यात ऑनलाइन आंतर जिल्हा बदलीने मागील अडीच महिन्यात वेगवेगळ्या जिल्हा परिषदेमधून ५० शिक्षक बीड जिल्हा परिषदेमध्ये रुजू झालेले आहेत मात्र त्यांना अद्याप पदस्थापना देण्यात आलेले नाही. वास्तविक पाहता ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीने आठवडाभरात जेवढे शिक्षक रुजू झाले असतील त्यांचे प्रत्येक सोमवारी सेवा जेष्ठता यादी जिल्हा परिषदेने तयार करून दर मंगळवारी अशा शिक्षकांना समुपदेशनाने पदस्थापना देण्याबाबतचे शासनाचे निर्देश आहेत आठवडाभरात आलेल्या सर्व शिक्षकांना पुढील मंगळवारी पद स्थापना दिलीच पाहिजे असा दंडक महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने दि.२३ मे २०२३ च्या शासन निर्णयानुसार घालून दिलेला असतानाही अडीच महिने उलटूनही संबंधित ५० शिक्षकांना पदस्थापना देण्यात आलेले नाही त्यामुळे जिल्ह्यात एकीकडे शिक्षकांना शाळेतील मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असताना शिक्षकांना पदस्थापना न देणे ही गंभीर बाब असून तातडीने प्रस्थापना करण्यात यावी अशी मागणी करण्यात आलेली आहे. पदस्थापना दिल्यानंतर ५० शिक्षकांना विना कामाचा पगार द्यावाच लागणार आहे. त्यापेक्षा त्यांची पदस्थापना करणं आवश्यक आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# रोटरी क्लब ऑफ बीडच्या आरोग्य शिबीरात अडीचशे रुग्णांची तपासणी

**बीड : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ बीड व मातोश्री हॉस्पिटल बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत ईसीजी टू डी इको बीएसएल शुगर तपासणी शिबिर मातोश्री हॉस्पिटल तुळजाई चौक बीड येथे झाले. या शिबिरात एकूण 230 रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी 58 रुग्णांचा टु डी इको करण्यात आला. प्रोजेक्ट चेअरमन डॉ.अमोल जोगदंड व डॉ. सौ.मीनल जोगदंड -पिंगळे व त्यांच्या संपूर्ण टीमच्या व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यात आला. प्रोजेक्टचे उद्घाटन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.मेघराज पिंगळे, सचिव संदीप खोड, राव यांच्या उपस्थितीमध्ये झाला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो. डॉ.मेघराज पिंगळे यांनी करत रोटरीच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. रो.डॉ.अमोल जोगदंड यांनी मेडिकल कॅम्प विषयी संपूर्ण माहिती उपस्थितांना सांगितली. या कार्यक्रमांमध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईक इत्यादी उपस्थित होते. क्लब ट्रेनर कल्याण कुलकर्णी, पीडीजी हरीश मोटवानी, पीपी वाय.जनार्दन रो.डॉ.बालाजी नवले, विवेक बडगे, ओमप्रकाश लोहिया, संतोष पवार, राजेंद्र मुनोत, प्रमोद करमाळकर, कृष्णा खांडे, सुरज लाहोटी, सुमित जैस्वाल, संदेश लोळगे, सुकेश राव, सुहास बेदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण कुलकर्णी यांनी तर सचिव संदीप खोड यांनी आभार प्रदर्शन केले.

आवश्यक असलेल्या रुग्णांचा टु डी इको शिबीरात अडीचशे रुग्णांची तपासणी तज्ञ डॉक्टरांनी केली. यावेळी 58 रुग्णांची टु डी इको तपासणी करणे गरजेचे होते. त्यानुसार ही तपासणी करण्यात आली.
--------

## श्री क्षेत्र चारदरी...प्रा.ईश्वर मुंडे सेवेकरी..



किल्ले धारूर ।प्रतिनिधी तालुक्यांतील बालाघाटांच्या डोंगर कुशीत वसलेले चारदरी हे गाव तेथील जागृत देवस्थान श्री हनुमान मंदिरामुळे चांगलेच प्रसिध्दीला आलेले असून भावीकांच्या श्रध्देचे ठिकाण बनले आहे.

चारदरी येथील गावकरी व परिसरातील भक्तगण यांच्या सहकार्याने या तीर्थ क्षेत्रात सन १९७८ पासून प्रत्येक शनिवारी भावार्थ रामायण ग्रंथाचे वाचन व कथन केले जाते.

श्री क्षेत्र चारदरी येथे जिल्हाभरातील नामांकीत शेकडो वाचक व सुचकांसह तीन ते चार हजार भाविक उपस्थीत राहातात या सर्वांना महा प्रसादाची महा पंगत दिली जाते.

दि.१७ ऑगष्ट २०२४ शनिवारी ईश्वर शिक्षण संस्था गांजपूर चे सचिव तथा राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे यांनी श्री क्षेत्र चारदरी येथे येऊन श्री हनुमान यांचे दर्शन घेऊन भावार्थ रामायणाचे वाचन केले.या वेळी सुचक म्हणून चारदरी चे भुमीपुत्र ह.भ.प.बाबासाहेब मुंडे महाराज होते.

या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी सर्व भावीकांच्या सोबत पंगतीत बसून महा प्रसाद सेवन केला.नंतर दुसऱ्या पंगतीला महा प्रसाद घेणाऱ्या भावीकांना स्वत:च्या हाताने वाढ करून सेवा केली.

## डॉ .बी.आर.आंबेडकर फाऊंडेशनच्या कृष्णाई पुरस्काराचे थाटात वितरण

## उत्तम हंबर्डे यांना कृष्णाई पत्रकारिता पुरस्कार प्रदान

नांदेड प्रतिनिधी : नांदेड : डॉ .बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या कृष्णाई पुरस्कारांचे वितरण नुकतेच नांदेड शहरात एका आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले पुज्य भदंत उपगुप्त महाथेरो ,पंय्याबोधी थेरो यांच्या मंगलकामनाने सुरू झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा. जोगेंद्र कवाडे, किनवटचे मा.आ. भीमराव केराम जयदीप कवाडे यांची उपस्थिती होती, डॉ .बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनचे बापूराव गजभारे यांनी प्रास्ताविकात पुरस्कार वितरण मागची भूमिका विशद केली तसेच संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली, पुरस्कार सोहळ्यात मार्गदर्शन करतांना पीआरपीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी कृष्णाई पुरस्काराच्या वेगळेपणाविषयी गौरव उद्गार काढले पुरस्कार हे ऊर्जा स्त्रोत



असतात डॉ .बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनने गेल्या २२ वर्षांपासून सातत्य टिकून ठेवल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले तर आ. भीमराव केराम यांनी आपल्या भाषणात अनेक उदाहरणे देऊन आईचे महात्मे विशद केले, जयदीप कवाडे यांनी देखील आपल्या भाषणात आईच्या त्यागाचे वर्णन करून सभागृहाला मंत्रमुग्ध केले, या वितरण समारंभात विद्यापीठाचे उपकुल सचिव डॉ. रवी सरोदे यांना समता गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर सदाशिव गच्चे, डॉ . अभय कुमार दांडगे, उत्तम हंबर्डे यांना कृष्णाई पत्रकारिता पुरस्कार देऊन मान्यवरांनी सन्मानित केले, मनोज गजभारे स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार मुक्ता बियाणी यांना जाहीर केला होता त्यांच्या वतीने त्यांच्या आई-वडिलांनी हा पुरस्कार स्वीकारला, यावेळी काशिनाथ मारतळेकर डॉ . शहाजी मारतळेकर , गुलाब हंबर्डे, सय्यद वहीत, बाबुराव परतवाड , आकाश हंबर्डे , धाराजी निलेवाड , राहुल गजभारे, ज्योती गजभारे, नागशेन जोगदंड, चांदू गवाले, नागोराव चक्रधर, गजानन हंबर्डे धम्मपाल झगडे, आदींची उपस्थिती होती, सूत्रसंचालन पंढरीनाथ बोकारे तर आभार आकाश गजभारे यांनी मानले.

# शेकडो लाडक्या बहिणींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना बांधल्या राख्या!

## बीडमध्ये सन्मान रणरागिनींचा सोहळा;चारशे महिलांना दिल्या साडी-चोळी भेट

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१८ : कल्पतरू प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बीड शहरातील सौ.के. एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी (दि.१८) अंगणवाडी सेविका व मदतनीस, पर्यवेक्षिका या लाडक्या बहिणींचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी शेकडो लाडक्या बहिणींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना राख्या बांधल्या. त्यानंतर साडेचारशेहून अधिक महिलांना साडी-चाळी भेट देऊन डॉ.क्षीरसागर यांनी सन्मान केला. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, महिला आघाडीच्या नियोजनातून आजचा कार्यक्रम होतोय. आशा सेविका, मदतनीस यांचे योगदान समाज विसरू शकत नाही. वार्ड, गाव पातळीवर झपाट्याने काम वाढत आहे. परंतु वेतन कमी प्रमाणात आहे. त्यात वाढ करण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द आहे. माझी लाडकी बहिण योजना राबविण्यात आशा सेविकांचे



योगदान असून योजनेचा प्रचार, प्रसार करण्याचे काम त्यांनी केले. प्रास्ताविक भाषणात डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, आता प्रत्येक महिला समाजाची लाडकी बहिण होत आहे. रक्षाबंधनानिमित्त त्यांना भेटण्याचा योग आला. त्यांना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिलेली साडी-चोळीची भेट पुरेशी नसून आशा सेविका, मदतनीस यांचे प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना भेट द्यावी. शासनाची अनेक प्रकारची सर्वेक्षणे, कामे आशा सेविका करतात. त्यांचे योगदान समाज विसरू शकत नाही. त्यांचा बहुमान करण्यासाठी त्यांचे वेतन, कायमस्वरूपी नोकरीचे प्रश्न मार्गी लावून शासन, प्रशासनाने सहकार्य करावे. महिला बालविकास मंत्री आदितीताई तटकरे ह्या पगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असेही त्या म्हणाल्या. यावेळी दुबे ताई, संगीता जाधव, शोभा सरवदे, थोरात ताई, छाया जाधव, कल्पना बांगर, शालिनी परदेशी, संगीता वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांनी दिल्या भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा आशा सेविका, मदतनीस महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांनी केले. त्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या भ्रमणध्वनीवरून संवाद साधत उपस्थित महिलांशी संवाद साधला. तसेच, आशा सेविका, मदतनीस यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# परळीत २१ ऑगस्ट पासून ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव, कृषी, पशु प्रदर्शनासह शेतकरी उपयोगी अनेक उपक्रमाचे आयोजन – धनंजय मुंडे

## राज्यातील शेतकऱ्यांसाठी पर्वणी; परळीत जय्यत तयारी सुरू

## धनंजय मुंडेंनी केली परळीतील नियोजित जागेची पाहणी, सभामंडप, स्टॉल्स, पार्किंग, सुरक्षा आदी व्यवस्था चोख करण्याच्या सूचना

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, सुनील तटकरे यांसह मान्यवर परळीत येणार




**परळी वैद्यनाथ, प्रतिनिधी):-**

(दि. 18) - महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे येत्या 21 ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला असून या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील अशा अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून लावलेले नवनवीन शोध, विविध आधुनिक उपकरणे, शासनाचे व अन्य नवनवीन उपक्रम तसेच विविध उत्पादने यांची माहिती खरेदी करता यावे या दृष्टीने महोत्सव अत्यंत महत्त्वाचा व शेतकऱ्यांना लाभदायक असून, या महोत्सवाचे उद्घाटन 21 ऑगस्ट रोजी दुपारी 12 वा. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने विविध आधुनिक यंत्र सामुग्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, नवनवीन संशोधन, चर्चासत्रे तसेच विविध उत्पादने, पशूंच्या विविध प्रजाती यांसह अनेक अर्थांनी हा महोत्सव महत्वपूर्ण ठरणार आहे. मुंडेंकडून तयारीचा आढावा व पाहणी तत्पूर्वी आज सकाळी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील शासकीय विश्रामगृहात अधिकाऱ्यांच्या समवेत कृषी महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, कृषी विभागाचे सह संचालक श्री दिवेकर, श्री मोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांसह ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांसह कृषी, महसूल पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते. धनंजय मुंडे यांनी या अधिकाऱ्यांसमवेत कृषी महोत्सवासाठी निवडण्यात आलेल्या परळी शहरातील बाजार समितीच्या मैदानावर सुरू असलेल्या संपूर्ण तयारीची पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यक्रमासाठी उभारण्यात येत असलेला मंडप, आसन व्यवस्था, त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेले शेकडो स्टॉल्स, पार्किंग व्यवस्था, भोजन व्यवस्था, सुरक्षा आदी सर्व बाबींची पाहणी करून सर्व व्यवस्थापन चोखपणे करण्याचे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत.

# महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये १०० महिला पाहायला मिळतील ; देवेंद्र फडणवीस यांचे मोठे विधान

**पाटोदा । प्रतिनिधी**

काही लोकं लाडकी बहिणी योजना बंद होईल असं सांगत आहे. ही योजना बंद करण्यासाठी कोर्टातही गेले. सावत्र भावांवर विश्वास ठेवू नका, हे भाऊ कालही काही देत नव्हते आणि आजही काही देत नाहीत. तुमच्या आर्शीवादाने आपल्या सरकारने 31 मार्चपर्यंतचे पैसे बजेटमध्ये ठेवले आहेत. सरकार पुन्हा येणार आणि पुन्हा एका पैशाचे पैसे ठेवणार. बजेटमध्ये नियमाने एकाच वर्षाचे पैसे ठेवता येतात, जर पाच वर्षांचे ठेवता आले असते तर आता ठेवून दिले असते. पण तुम्ही काळजी करू नका जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे तोपर्यंत ही योजना कोणी बंद करू शकणार नाहीत, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी सर्व महिलांना दिला.

विधानसभेला 100 महिला पाहायला मिळतील- देवेंद्र फडणवीस महिलांच्या जीवनामध्ये परिवर्तन होत आहे. मोदीजींनी सांगितलंय 2027 नंतर जेवढ्या निवडणुका होणार आहेत. विधानसभा आणि लोकसभेमध्ये महिला प्रतिनिधी निवडून जाणार आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेत 100 महिला पाहायला मिळतील तर लोकसभेमध्ये दुप्पट महिला पाहायला मिळतील. मोदीजांनी देश चालवायचीच जबाबदारी महिलांकडे दिल्याचं देवेंद्र फडणवीस



म्हणाले. मला कोणी देवेंद्रजी म्हणतं, देवेन भाऊ म्हणतं, देवेन भाऊ म्हणत पण मला माझ्या बहिणा मला जेव्हा 'देवा भाऊ' बोलतात ते सर्वात जास्त आवडतं. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं, विकसित भारत घडवायचा असेल तर आमच्या मातृशक्तीला, बहिणींना देशाच्या मुख्यधारेमध्ये आणल्याशिवाय भारत विकसित होणार नाही. मोदींनी विकसित भारताकरता विकसित महिला, विकसित मातृशक्ती अशा प्रकारचे महिला केंद्रित धोरण सुरू केल्याचं फडणवीसांनी सांगितलं.

महाविकास आघाडीमधील पक्षांमध्ये लाडकी मुलगी आणि लाडका मुलगा या दोन योजना चालतात. मुख्यमंत्री झाला तर माझा मुलगा आणि पंतप्रधानमंत्री झाला तर माझी मुलगी आणि मुख्यमंत्री झाली तर माझी मुलगी अशा दोनच योजना आहेत. आमच्याकडे बारा कोटी जनतेतील महिला आमच्या भगिणी आहेत. ही राखी असं कवच आहे जे मला कोणी काही करू शकणार नाही. आता हे कवच घेऊन मैदानात जातो आणि तुमच्यासाठी संघर्ष करून वेगवेगळ्या योजना घेऊन येतो, असं म्हणत फडणवीसांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

## रक्षाबंधन दिवसभरात केव्हाही साजरा

राखी पौर्णिमा अर्थात बहिणीने भावाच्या हाताला राखी बांधणे. यासाठी भद्रा वर्ज्य नाही आणि राखी बांधण्यासाठी कोणत्याही वेगळ्या मुहूर्ताची आवश्यकता नाही. त्यामुळे १९ ऑगस्ट रोजी सोमवारी नेहमीप्रमाणे राखीपौर्णिमा साजरी करावी, असे पंचांगकारांचे मत आहे. रक्षाबंधन म्हणजे मुंज, विवाह, वास्तूप्रमाणे मंगल कार्यासारखे नाही. खरे तर ते सामाजिक व कौटुंबिक उत्सव आहे. भद्रा असतानाच्या काळात म्हणजे दिवसभरात आपल्या सोयीने केव्हाही रक्षाबंधन करता येईल. त्यामुळेच पंचांगात रक्षाबंधनाची वेळ दिलेली नाही. हल्ली फक्त पौर्णिमेस रक्षाबंधनाचा सण साजरा होत नाही.

रक्षाबंधन विधी

तांदूळ, सोने व पांढऱ्या मोहऱ्या किंवा दूर्वा, अक्षता, केशर, चंदन, मोहरीचे दाणे एकत्र करून त्यांची रेशमी कापडात पुरचुंडी बांधून त्याला रंगीत दोरा बांधून रक्षा अर्थात राखी तयार करावी. ती देवघरात कलशावर ठेवून तिची पूजा करावी. नंतर ती राखी बांधावी. बाजारात उपलब्ध असलेल्या प्लास्टिक, स्पंज इत्यादीपासून तयार केलेली फॅन्सी राखी बांधावयाची असेल तर भद्राकाळातही बांधता येईल.

## दिव्यात गुजराती विकास मंडळा तर्फे देवी दशमीचे विसर्जन उत्साहात.

ठाणे - संतोष पडवळ

ठाणे, दिवा ता १८ ऑगस्ट : गुजराती विकास मंडळ (दिवा) च्यावतीने दिवा येथील गुजराती, मारवाडी समाजाच्या देवी दशमीचे विसर्जन दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गुजराती व मारवाडी समाज्याकडून देवी दशमी निमित्त १० वाजता घरातील देवीचे 10 दिवसाने विसर्जन होते आणि विशेषतः या विसर्जनाच्या दिवसावर गुजराती विकास मंडळ (दिवा) अध्यक्ष आणि त्यांच्या संपूर्ण मंडळाने यादिवशी जागरण आणि विसर्जन यशस्वीपणे केले.




यंदा हा जागरण व विसर्जन कार्यक्रम आगासनगाव येथील तलाव येथे आयोजित करण्यात होता. गुजराती विकास मंडळच्या दिवा कार्यकर्त्यांच्या मदतीने यशस्वीपणे विसर्जन करण्यात आले प्रसंगी चहापाणी व अल्पोहरची व्यवस्था करण्यात आली. यावर्षी विसर्जन स्थळाचा कालावधी जास्त असल्याने लोकांना त्यांच्या घरातून विसर्जन घाटावर जाण्यासाठी रात्रभर वाहनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. भाजप दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी वाहने उपलब्ध करून दिली. मंडळाचे अध्यक्ष अशोक सोळंकी यांनी दिवा येथील सर्व ज्येष्ठ नेते, महानगरपालिका व पोलीस प्रशासन, मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक पटेल, वैशाली भानुशाली, किशन वालेरा, जयेश सोलंकी, धीरज वालेरा, किरण - सोळंकी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मदत केली.

## बम.. बम..भोलेच्या गजरात फेरीसाठी भाविक त्र्यंबकेश्वरला दाखल

**नाशिक/प्रतिनिधी**

श्रावण महिन्यामध्ये तिसऱ्या सोमवारी ब्रह्मगिरी प्रदक्षिणे साठी भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात, या पार्श्वभूमीवर रविवारी दुपारपासूनच भाविक बम बम भोले च्या गजरामध्ये प्रदक्षिणेसाठी त्र्यंबकेश्वरला दाखल होण्यास सुरुवात झाली . मंदिरा लगत वाहनांना प्रवेश बंदी असल्यामुळे खांबाळ्यापासून भाविकांना एसटी बस व सिटी लिंक च्या बसने प्रवास करावा लागणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळातर्फे २७० आणि सिटी लिंक कडून ८० बस गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. अनेक भावीक रविवारी दुपारपासूनच त्र्यंबकेश्वर नगरीत दाखल झाले आहेत. रविवार सायंकाळी प्रदक्षिणेला सुरुवात होत असून दरम्यान संभाव्य गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन व आरोग्य विभाग यांच्यातर्फे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी खंबाळापासूनच खाजगी वाहनांना प्रवेशाला प्रतिबंध केला जाणार आहे. त्यामुळे फेरीसाठी आलेल्या भाविकांना तसेच मंदिरात दर्शनासाठी आलेल्या




भाविकांना एसटी किंवा सिटीलींकच्या बसने त्र्यंबकेश्वर पर्यंत प्रवास करावा लागेल. खाजगी वाहने उभी करण्यासाठी वाहन तळाची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. त्र्यंबकेश्वर साठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे एकूण २७० जादा बस गाड्यांचा बंदोबस्त करण्यात आला आहे. यापैकी १९० गाड्या नाशिक वरुन तर खंबाळा येथून ५० गाड्या फेरीसाठी उपलब्ध असतील. याशिवाय शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या सिटीलींकडून नियमित व अतिरिक्त अशा एकूण 80 जादा बस गाड्या उपलब्ध केल्या जाणार आहेत. रविवारी (दि.१८) आणि सोमवारी (दि.१९) असे दोन दिवस या गाड्या उपलब्ध राहणार आहेत. त्यामुळे भाविकांची गैरसोय ही टळणार आहे. एसटी बस गाड्या ह्या नवीन सीबीएस बसस्थानक, आंबोली, पहिणे, घोटी, खंबाळे या ठिकाणाहून सोडवण्यात येणार आहेत. तर पंचवटीतील निमानी बस स्थानकावरून त्र्यंबकेश्वर साठी बस गाड्या उपलब्ध राहतील, तसेच नाशिक रोड वरून त्रंबकेश्वर ला जाण्यासाठी देखील बस गाड्या सोडल्या जातील.

## ई-पीक पाहणीचे सर्व्हर डाऊनमुळे शेतकरी नोंदणीपासून वंचित ठेवायचे आहेत काय?दत्ता वाकसे

### कृषिमंत्रीसाहेब गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सर्व्हर डाऊन

**किचकट प्रक्रियामुळे शेतकऱ्यांना पीकपेरा अपलोड करण्यासाठी अडचणी येत आहेत..!**

ॲपच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक अडचण निर्माण होत असल्याने नोंदणी होऊ शकलेली नाही. तसेच नोंदणी करण्याची किचकट प्रक्रिया, मोबाइल नेटवर्क नसणे अशा अनेक अडचणी निर्माण होत आहे. अनेक शेतकरी या प्रक्रियेबाबत अज्ञानी असल्याने ई-पीक नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही असे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे.

मागील वर्षीपासून शासनाने ई-पीक पाहणीसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे; परंतु ई-पीक पाहणी ॲपच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. अडचणींमुळे अनेक शेतकरी नोंदणी करून शकलेले नाहीत. १ जुलैपासून २०२४ मधील ई-पीक नोंदणीस सुरुवात झाली आहे. पेरणीची माहिती ऑनलाईन पद्धतीने नोंदवण्यासाठी सरकारने ई-पीक पाहणी ॲप विकसित केले आहे; मात्र आठ दिवसांपासून सर्व्हर डाऊन, नेटवर्कची अडचण निर्माण झाली असल्याने अनेक शेतकरी पिकांची नोंद करू शकले नाही. ई- पीक पाहणी कशी करावी, याची माहिती अनेक शेतकऱ्यांना नसल्याने त्यांना इतरांची मदत घेऊन नोंदणीचे काम पूर्ण करावे लागत आहे. शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध सुविधा तसेच अनुदान मिळण्यासाठी ई- पीक नोंदणी आवश्यक आहे. पीकविमा काढल्यानंतर मिळण्यासाठीदेखील नोंदणी बंधनकारक करण्यात आलेली आहे. जुलै महिन्यापासून ई-पीक पाहणीचे काम सुरू करण्यात आले आहे. परंत. यंदा कमी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या विलंबाने झाल्या. याचा परिणाम पिकांच्या नोंदणीवर झाला आहे. यंदाच्या वर्षी खरीप हंगामासाठी ई-पीक पाहणीला १ ऑगस्ट २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत एकूण ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे सर्व्हर व इतर तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी ई-पीक पाहणी पासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ॲपच्या सर्व्हरमधील बिघाड दुरूस्तीसह ई-पीक नोंदणीची मुदत वाढविण्याची मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केली आहे ..



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077